# 1. आंतरराष्ट्रीय संबंध

प्र. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्याख्या सांगून स्वरुप सांगा.

उत्तर:- प्राचीन कालखंडापासून राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. प्राचीन कालखंडापासूनच प्लेटो, ॲरिस्टॉटल, कौटील्य, शुक्राचार्य (शुक्रनिती) इत्यादींच्या लिखाणातून एका राज्याचे दुसऱ्या राज्याशी संबंध कसे असावे या बाबतचे लिखान दिसून येते राष्ट्रांच्या वाढत्या गरजा व परस्परावलंबित्व यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, लष्करी, औद्योगिक, राजकीय स्वरुपाचे संबंध असू शकतात. राष्ट्राराष्ट्रात असणारे हे संबंध मैत्री, जवळीकता, आपुलकी, जिव्हाळा आणि शत्रुत्वाचे (संबंध, तणाव, दुरावा, भेदभाव) अशा प्रकारचे असतात. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात 1789 साली जेरेमी बेनथम या अभ्यासकाने आंतरराष्ट्रीय संबंध हा शब्दप्रयोग पहिल्यांदा केला.

पहिल्या महायुद्धानंतर एक अभ्यास शाखा म्हणून त्या विषयाच्या अभ्यासाला प्रारंभ झाला तर पूर्वी इंग्लंडमधील वेल्स विद्यापीठात इतिहास विषयाचा एक भाग म्हणून हा विषय अभ्यासला जात होता. दुसऱ्या महायुद्धानंतर नवस्वतंत्र राष्ट्रांची वाढती संख्या अमेरीका व सोवीयत रशियातील शितयुद्ध अशा अनेक कारणामुळे जगातील सर्वच देशात या विषयाचा अभ्यास होत आहे. या विषयाचे वाढते महत्व व उपयुक्तता तरुणांना या क्षेत्रात रोजगाराची एक नवी संधी उपलब्ध होत आहे.

## आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्याख्या:-

'दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रातील संबंधाचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंध होय.'

विसाव्या शतकात हॅन्स मॉर्गेन्थॉने या विचारवंताने राष्ट्रांच्या वर्तनाचा सत्तावादी दृष्टीकोनातून केलेल्या अभ्यासाने या

विषयाच्या अभ्यासकात अधिक वाढ झाली परिणामतः या विषयाचा अर्थ, व्याख्या स्पष्टकरणाऱ्यांची संख्याही वाढली.

1) हॅन्स मॉर्गेन्थॉच्या मते :-

"आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे सत्ता प्राप्तिसाठी चालतेला संघर्ष होय."

2) केनेथ थॉमसनच्या मते :-

"आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील संबंध सुधारण्यास किंवा बिघडविण्यास कारणीभूत असलेल्या परिस्थितीचा अभ्यास करणे होय."

3) क्विन्सी राईटच्या मते :-

"जागतिक राजकारणातील प्रबळ किंवा कमकुवत अशा स्वरूपाच्या 2 किंवा 2 पेक्षा अधिक राष्ट्रातील संबंधांना स्पष्ट करणारे शास्त्र म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंध होय."

4) चार्ल्स श्लेश्चरच्या मते :-

"आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्राराष्ट्रातील सर्व प्रकारच्या संबंधाचा अभ्यास केला जातो."

5) स्टेनले हॉफमनच्या मते :-

"राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव टाकणाऱ्या घटनांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंध होय."

वरील सर्व व्याख्या आंतरराष्ट्रीय संबंधाचा आशय स्पष्ट करतात. आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाला आंतरराष्ट्रीय राजकारण या संकल्पनेनेही संबोधले जाते. आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकरण या दोनही संकल्पना एकाच अर्थाने वापरल्या जातात.

परंतु या दोन्ही संकल्पनांचा अर्थ अभ्यासक्षेत्र व अभ्यास करण्याच्या पद्धतीत फरक आहे. हॅन्स मॉर्गेन्थॉ व केनेथ थॉम्पसन यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय संबंधाचे अविभाज्य अंग मानले आहे. आंतरराष्ट्रीय संबंध आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या तुलनेत अधिक व्यापक आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास फक्त राजकीय दृष्टीकोनातूनच केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संबंधावर पडत असतो. आंतरराष्ट्रीय राजकारण आंतरराष्ट्रीय संबंधाला नियंत्रित करते. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राराष्ट्रातील सत्ता प्राप्तीचा संघर्ष, सत्तेचे राजकारण, आंतरराष्ट्रीय कारलष्करी डावपेच या विषयाच्या प्रामुख्याने अभ्यास केला जातो म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय संबंधाची राजकीय बाजू म्हणतात. आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय अधिक व्यापक व गुंतागुंतीचा आहे. या विषयाच्या स्वरूपाविषयी अभ्यासकात एकमत नाही. कारण कालमानानुसार आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्वरूपात बदल झाला आहे. प्रारंभिक काळात या विषयाचे ऐतिहासिक स्वरुप होते. पहिल्या महायुद्धानंतर यास आदर्शवादी व सत्तावादी स्वरूप प्राप्त झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर वर्तनवादी राजकीय आणि शीतयुद्धाचे स्वरूप प्राप्त झाले. आज या विषयाला आर्थिक, समन्वयवादी, सहकार्याचे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या पालनाचे स्वरुप प्राप्त होत आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्वरुपाचे विश्लेषण खालील मुद्द्यांच्या आधारे करता येतो.

1) **स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून उदय / स्वतंत्र अभ्यास शाखा :-**

विसाव्या शतकाच्या प्रारंभी या विषयावर

ऐतिहासीक दृष्टीकोनाचा अधिक प्रभाव होता. त्यामुळे हा विषय इतिहासाची एक अभ्यास शाखा समजून ऐतिहासीक पद्धतीनेच अभ्यासला जात असत. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर या विषयाची व्याप्ती वाढत गेली. परिणामत: राज्यशास्त्र विषयातील एक स्वतंत्र अभ्यास-शाखा म्हणून मान्यता मिळाली. मार्टिन कापलान या अभ्यासकाने विषयाला राज्यशास्त्राचा सहयोगी विषय मानले. हेरॉल्ड लॉस्वेल आणि हॉफमन यांनी या विषयाचा स्वतंत्र दर्जा मान्य केला. क्विन्सी, राईट मेलिंग, जॉनसन व कॅपर इत्यादींनी या विषयाला स्वतंत्र अभ्यासशाखा मानले अलिकडील काळातील जागतिक राजकारणात घडणाऱ्या घडामोडी वाढते बहुध्रुवीकरण इत्यादीमुळे या विषयाला एक स्वतंत्र अभ्यासशाखांचा दर्जा ~~आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संबंधाचे विश्लेषण खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.~~ प्राप्त झाला आहे.

2) आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन / स्वरूप -

मागील 117 वर्षांच्या कालखंडात आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाच्या अभ्यास शाखेत नवनवीन अभ्यास विषयाचा समावेश झाला आहे. यामुळे या विषयाची व्याप्ती वाढली परिणामत: या विषयाचा सखोल व सविस्तर अभ्यास करण्यासाठी राज्यशास्त्रासह अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र अशा अनेक विषयांचा आधार घ्यावा लागत आहे. या अनेक विषयातील घटनांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारण, आंतरराष्ट्रीय पडत असतो. यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाला नवी दिशा प्राप्त होते, म्हणून या विषयाचे स्वरुप अंतर विद्याशाखीय बनले आहे. त्यामुळेच या विषयाचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासक, संशोधक, लेखक व विद्यार्थी या सर्वांना अनेक विषयांची मदत घेऊन हा विषय समजून घ्यावा

लागतो.

3) आंतरराष्ट्रीय संबंध एक कला :-

मानवी जीवनाच्या प्रत्येक अभ्यास शाखा म्ह एक कलाच होत्या असे क्विन्सी राइट म्हणतो या कले रूपांतर ज्ञान आणि वस्तू निर्मितीच्या प्रक्रियेत झाले इतर देशांशी संबंध प्रस्थापित करताना त्याचे स्वरूप मैत्रीचे व जवळीकतेचे ठेवणे ही एक कलाच असते. विशेषत्वा प्रतिकूल परिस्थितीत युध्दे ऐवजी बुध्दीचा म्हणजेच अहिं शांतता, समउपचार, वाटाघाटी व करार या मार्गाचा अवलं करून संवाद निर्माण करणे ही एक कला आहे. या कलेचा वापर करून राष्ट्र संबंध निर्माण करत असतात. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासानेच अशी कला व कौशल्य शिकता येतात. उत्तम प्रशासक योग्य राजनय (दूत Dephlomat अचूक अंदाज, प्रशिक्षण या सर्वांचा समावेश कला या संकल्पनेत होतो.

4) संघर्ष आणि समन्वयाचे शास्त्र :-

आंतरराष्ट्रीय संबंध मैत्रीचे व शत्रुत्वाचे असतात. दोन देशाच्या संबंधात परस्पर सहकार्य, देवाण घेवाण, सामंजस्य व समन्वय असतो. तसेच परस्पर मतभेद, संघर्ष, युध्द, आक्रमण शस्त्राअस्त्र स्पर्धा हे ही असते. आंतरराष्ट्रीय संबंधात संघर्षासोबत सहकार्याचा अभ्यास केला जातो. यामुळेच आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संबंध या विषयात राष्ट्राराष्ट्रात परस्पर संघर्ष तनाव आणि सहकार्य जवळीकता व मित्रत्व निर्माण होण्याची एक साखळी असते. तसे ते कालचक्र ही असते.

5) लोकशाहीचे स्वरूप :-

दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक नवस्वतंत्र राष्ट्राने लोकशाही शासनाचा स्विकार केला. वाढत्या

लोकशाहीमुळे लोकमताचे महत्व वाढले. दोन देशातील संबंध व परराष्ट्र धोरणातील निर्धारणात जनतेचा सहभाग वाढला. परिणामत: राजकीय प्रक्रिया आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे लोकशाहीकरण झाले. दुसऱ्या देशासोबत संबंध स्थापन करताना लोकशाही मार्गाचा अवलंब मोठ्या प्रमाणात होऊ लागला. लोकशाही मार्गाचा वापर केल्यानेच संबंधात जवळीकता येऊ शकते यावरून राष्ट्रांचा विकास दृढ होऊ लागला.

6) <u>नव स्वातंत्र्य राष्ट्राचा उदय / आंतरराष्ट्रीय स्वरूप</u> :-

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाला कलाटणी देणाऱ्या अनेक घटना घडल्या भारतात शीत युद्धाचा उदय नव स्वातंत्र्य राष्ट्राचा उदय नव स्वतंत्र राष्ट्रांच्या उदयामुळे राष्ट्रांच्या संख्येत वाढ झाली आंतरराष्ट्रीय राजकारणातील सहभागित्वाचे प्रमाण वाढले आंतरराष्ट्रीय राजकारणीवरील युरोपियन राष्ट्राचे वर्चस्व कमी झाले संयुक्त राष्ट्र संघटनेतील सभासद संख्या वाढली प्रत्येक अभ्यासकाला आंतरराष्ट्रीय अभ्यास करता नव स्वातंत्र्य राष्ट्रांची दखल घेणे अनिवार्य झाले. परिणामत: आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंधाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

7) <u>आंतरराष्ट्रीय संघटनांची स्थापना</u> :-

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटनांची स्थापना झाली. उदा:- राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, आशियात ओपेक सार्क, नाटो, वार्सा, सिटो सेन्टो गॅट करार, जागतिक व्यापार संघटना, युरोपिय महासंघ जी फोर, जिसेवत, ब्रीक्स इत्यादी या

सर्व संस्न संघटनाच्या स्थापनामुळे आंतरराष्ट्रीय संबंध राजकारणाच्या अभ्यासकाची दिशा बदलली याचा परि आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्वरुपावर झाला.

प्रत्येक राष्ट्र संघटनाच्या व्यासपिठावरून आपले प्रश्न सोडू लागले या सर्व प्रश्नांची सोडवणूक युध्द व संघर्षाऐवजी लोकशाही मार्गाने, आंतरराष्ट्रीय कायद्याने पालन करून होऊ लागली परिणामत: आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप विभागीय व लोकशाहीचे बनले.

8) आंतरराष्ट्रीय संबंध एक तत्वज्ञान :-

प्राचीन काळात अनेक राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय संबंधाची कला जोपासताना एक स्वतंत्र तत्वज्ञान निर्माण केले. यातील बऱ्याच तत्वज्ञानाचा वापर मध्ययुगीन, आधुनिक व उत्तर आधुनिक युगात म्हणजेच (आज) बरेच राष्ट्र राष्ट्र करत आहेत. हिटलरने जर्मनी नाझी तत्वज्ञानाचा उदय केला इटलीत मुसोलीनने फॅसिस्ट Fascism तत्वज्ञानाचा उदय केला तर दुसऱ्या बाजूने आंतरराष्ट्रीय शांतता, सहकार्य, युध्द याही तत्वज्ञानाची निर्मिती झाली.

वरील प्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप स्पष्ट करता येते.

आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती :-

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाच्या अभ्यास कक्षेमध्ये ज्या ज्या घटकांचा समावेश केला जातो. त्या सर्वांना आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे म्हणजेच व्याप्तीचे घटक समजले जातात. आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप गतिशील असल्यामुळे त्याची व्याप्ती निश्चित करणे अवघड आहे. आंतरराष्ट्रीय स्थरावरील सर्वच घटना व घडामोडीचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्याप्तीत केला जातो.

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्याप्तीचा अभ्यास खालील मुद्द्यांच्या आधारे करता येतो.

1) राष्ट्रीय सत्तेचे घटक :-

मॉर्गेनथॉच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे सत्ता प्राप्ती व सत्ता संघर्षाचा खेळ आहे. या खेळात विजयी होण्यासाठी आपले प्रभुत्व व वर्चस्व सिद्ध करण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला सत्तेची आवश्यकता असते. राष्ट्राकडील या सत्तेचे मोजमाप त्या देशांतर्गत असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्ती लष्करी सामर्थ्य आर्थिक व्यवस्था लोकसंख्या भौगोलिक स्थिती राजकीय नेतृत्व शासनव्यवस्था तांत्रिक व वैज्ञानिक प्रगती, माहिती तंत्रज्ञानातील प्रगती, कृषी क्षेत्र, जनतेचे मनोबल यासह शेजारील व इतर देशांशी असणारे संबंध आंतरराष्ट्रीय संघटनेतील स्थान व जागतिक लोकमत या महत्वपूर्ण घटकांच्या आधारे केले जाते. परिणामतः या सर्व घटकांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो या घटकांचा आधार घेऊनच राष्ट्र परस्पराशी संबंध स्थापन करतात.

2) राष्ट्राराष्ट्रातील संबंधाचा अभ्यास :-

आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे दोन किंवा दोनपेक्षा जास्त देशातील संबंध होय. राष्ट्राराष्ट्रातील संबंध मित्रत्वाचे आणि शत्रुत्वाचे असतात. दोन देशातील संबंध इतर अनेक बाबींना प्रभावित करतात. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण प्रभावित होते. दोन देशाच्या संबंधाला दिशा देणाऱ्या वाटाघाटी व करार यांचा अभ्यास केला जातो. संबंध निर्माण करत असताना प्रत्येक देश कोणत्या विचार प्रणालीचा व तत्वज्ञानाचा आधार घेते. याचाही अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

3) परराष्ट्र धोरणाचा अभ्यास :-

परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंध एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोनही मार्फत राष्ट्रीय हित साध्य करण्याचा प्रयत्न राष्ट्र करतात. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून इतर देशाशी असलेल्या संबंधाला दिशा देण्याचे व निश्चित करण्याचे काम परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून केले जाते. परराष्ट्र धोरणाचा प्रभाव दुसऱ्या देशांवर पडत असतो. प्रत्येक देशाचे परराष्ट्र धोरण सारखेच असते. कारण परराष्ट्र धोरण ठरवणाऱ्या घटकांमध्ये (इतिहास, परंपरा, संस्कृती, विचारसरणी, नेतृत्व, अर्थव्यवस्था) वेगळेपणा असतो.

4) आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास :-

वर्तमान आंतरराष्ट्रीय राजकारणात आंतरराष्ट्रीय संघटनांना अधिक महत्व प्राप्त झाले. अनेक देशांचे संबंध या संघटनांमधून व्यक्त होतात. आपले परस्परावलंबित्व, गरजा, सुरक्षितता या संघटनांच्या माध्यमातून पुर्ण केल्या जातात. 1920 ला राष्ट्रसंघ, 1945 ला संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली याशिवाय आंतरराष्ट्रीय बँक (WB), आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF), जागतिक व्यापार संघटना (WTO), कामगार संघटना इत्यादी आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या संघटना आहेत. या सर्व संघटना जागतिक शांतता, सुरक्षितता पर्यावरण व मानवी हक्काचे संरक्षण करण्यात महत्वाची भुमिका बजावतात.

5) विभागीय संघटनांचा अभ्यास :-

आंतरराष्ट्रीय संबंधात आंतरराष्ट्रीय संघटनांसोबतच विभागीय संघटनांचाही अभ्यास केला जातो. आर्थिक व व्यापारी हित संबंधात वाढ करण्यात या विभागीय संघटनांनी

महत्वाची भुमिका बजावली आहे. यामध्ये प्रामुख्याने आसि-यान (ASIAN), ओपेक (OPEC), सार्क (SAARC), ब्रिक्स (BRICS), अलिप्तवाद संघटना (नाम - NAM), युरोपिय महासंघ इत्यादी या सर्व संघटनातून प्रादेशिक विकास सहकार्य व समन्वयाच्या भुमिकेत राष्ट्रांचा सहभाग वाढत गेला. या संघटनातून राष्ट्रीय हित संबंधाचे संरक्षण व जोपासना करण्यात महत्वाची भुमिका बजावली. विभागीय प्रश्नांची सोडवणूक विभागीय स्तरावरच या संघटनांमुळे झाली. दोन देशांच्या संबंधाला व्यापक व गतिशील स्वरुप या संघटनांमुळे प्राप्त झाले. म्हणून आंतरराष्ट्रीय संबंधात विभागीय संघटनांचा अभ्यास केला जातो.

6) विचारसरणीचा अभ्यास :-

प्रत्येक राष्ट्र विशिष्ट विचार प्रणालीच्या आधारावरच संबंधाची निर्मिती करते. त्यामुळे दुसऱ्या देशाशी संबंध निर्माण करताना तेथील विचार प्रणालीचा अभ्यास करावा लागतो. १९व्या व २०व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणाला व दोन देशातील संबंधाला वसाहतवाद, साम्राज्यवाद, फॅसीझम, नाझिझम, साम्यवाद, भांडवलवाद, अलिप्तवाद व लोकशाही या विचारसरणींनी प्रभावित केले. तर २१व्या शतकात उदारमतवाद मुक्त अर्थव्यवस्था जागतिकीकरण, पर्यावरणवाद, स्त्रिवाद, मानविभक्त, बहुसंस्कृतीवाद, नवउदारमतवाद अशा अनेक विचारसरणींनी प्रभावित केले आहे. त्यामुळे या विचारसरणींची प्रभावित केले अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यास कक्षेत केला जातो.

7) आंतरराष्ट्रीय कायदे :-

दोन देशाच्या संबंधाचे स्वरुप विधायक व नैतिक असणे हिताचे असते. यासाठी त्या देशांनी आंतरराष्ट्रीय नियम व अटींचे पालन करणे आवश्यक आहे. म्हणूनच

सर्वच राष्ट्रांनी परस्परांना या आंतरराष्ट्रीय नियमात बांधून घेतले आहे. या नियमांचे पालन सर्वच राष्ट्रांनी सहमताने करावे यासाठी एका केंद्रिय सत्तेमार्फत आंतरराष्ट्रीय कायद्याची निर्मिती केली जाते. कोणत्याही राष्ट्राला इतर राष्ट्राशी संबंध निर्माण करतांना या आंतरराष्ट्रीय कायद्याचा अभ्यास करावा लागतो. जेणेकरून त्याला आपले ~~वर्चस्व~~ वर्तन नियंत्रीत व सुधारणा करता येते. आंतरराष्ट्रीय कायद्यामुळेच युद्धजन्य परिस्थितीला नियंत्रित करता येते. आंतरराष्ट्रीय कायदेत जागतिक स्थरावरील ~~बत~~ राष्ट्राच्या वर्तनाची नियमावली ठरवत असतात. प्रस्तुत नियमावली प्रत्येक देशाच्या राष्ट्रीय हित व सुरक्षितेचे संरक्षण करणारी असते.

8) लष्करी सामर्थ्याचा अभ्यास:-

अलिकडील काळात राष्ट्राचे महासत्ता ठरवण्याचे सुत्र, लष्करी सामर्थ्यातून ठरविले जाते. जगाच्या अभ्यासकांनी दुसऱ्या महायुद्धानंतर लष्करी सामर्थ्यात प्रचंड वाढ झाली. अमेरिका, सोवियत रशिया या दोन महासत्ताक देशांनी परस्परांच्या संरक्षणासाठी विशाल व अत्याधुनिक शस्त्रांची निर्मिती केली. या शस्त्र निर्मितीत अधिक प्रमाणात संहार शस्त्र अस्त्रांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. या शस्त्रांच्या निर्मितीमुळे जागतिक शांतता धोक्यात आली. राष्ट्राराष्ट्रातील द्वेष भावना व शत्रुत्व वाढले. वाढत्या शस्त्र अस्त्र स्पर्धेला रोखण्यासाठी शस्त्र नियंत्रण व निशस्त्रीकरण या संकल्पनांचा उदय झाला. यातूनच NPT, PTBT, CTBT, अशा अण्वस्त्र प्रसारावर बंदी आणणाऱ्या करारांचा उदय झाला. या करारांचे उलंघन करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध अमेरिकेने मानवतावादी हस्तक्षेपाच्या नावाखाली लष्करी कार्यवाही केली.
उदा:- ईराक, अफगाणिस्तान व उत्तर कोरीया सोबतचा वाद याबाबतचाच आहे.

९) समकालीन / वर्तमानकालीन घटनांचा अभ्यास :-

आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय जीवंत, प्रवाही व गतिशील स्वरूपाचा आहे. या विषयात दैनंदिन नित्यनियमाने काही नविन घटना घडत असतात. या वर्तमानातील घटनांमुळे दोन देशांच्या संबंधात, आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संबंधात व व्याप्तीत बदल होत होता. प्रस्तुत बदल सकारात्मक व नकारात्मक ही असतो. या बदलामुळे आंतरराष्ट्रीय संबंधातील प्रत्येक घटना वैश्वीक रूप धारण करते. माहिती तंत्रज्ञान व मुक्त अर्थव्यवस्थेने राष्ट्रांना अधिक जवळ आणले. या जवळीकतेचा परिणाम संबंधाच्या प्रगलभतेवर जातो. उदा :- पर्यावरण, मानवी हक्क, दहशतवाद, नशील पदार्थांची तस्करी, मानवी तस्करी इत्यादी. या सर्व विषयांनी राष्ट्रांच्या संबंधाला प्रभावित केले.

१०) जागतिक शासनाचा अभ्यास :-

आंतरराष्ट्रीय संबंध या अभ्यास शाखेत अनेक विषयासोबत जागतिक शासन या संकल्पनेचा अभ्यास केला जातो. जगातील सर्वच मानवजातीच्या कल्याणाचा विचार जागतिक शासनात केला जातो. राष्ट्रीय नागरिकत्वाऐवजी जगाचे नागरिकत्व ही संकल्पना रुजवली जाते. जागतिक शासनामुळे राष्ट्राराष्ट्रातील युद्ध, संघर्ष, तणाव कमी होऊन सहकार्य, शांतता व सुसंवादाची प्रक्रिया निर्माण होते. या प्रक्रियेला समजून घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधात जागतिक शासन या संकल्पनेचा अभ्यास केला जातो.

११) राष्ट्रीय हिताचा अभ्यास :-

आंतरराष्ट्रीय संबंध व परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हिताला प्राधान्य देतात. प्रत्येक राष्ट्र राष्ट्रीय हित संबंधा-

ची जोपासना, संवर्धन व संरक्षण व्हावे म्हणून इतर देशाशी संबंध निर्माण करतात. त्यामुळे या विषयात राष्ट्रीय हित म्हणजे काय व हे हित साध्य करण्यास राष्ट्र कोणत्या मार्गाचा अवलंब करतो याचा अभ्यास केला जातो. या अभ्यासामुळे इतर देशाशी संबंध निर्माण करत असताना आपणास कोणता मार्ग स्विकारा वा कोणत्या योजना आखाव्यात याची जाणीव होते.

वरील प्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाच्या अभ्यास शाखेत अनेक विषयांचा अभ्यास केला जातो.

* आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्त्व :-

वर्तमान जागतिकीकरणाच्या युगात राष्ट्रांचे परस्परावलंबित्व अधिक वाढले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आणि व्यापारविषयक वाढत्या देवाण घेवाणीमुळे प्रत्येक घटनेचा प्रभाव राष्ट्रांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या पडत आहे. यामुळे प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्राची शासन व्यवस्था राजकीय नेतृत्व व त्यांचे वर्तन आणि परराष्ट्र धोरणाच्या कलेचा अभ्यास करुन माहितीतील अद्यावतपणा ठेवतो ज्याचा फायदा इतर देशाशी संबंध निर्माण करताना होतो या दृष्टीने क्विन्सी राईट व पामर आणि पार्किन्स यांनी आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्त्व सांगितले आहे ते पुढील प्रमाणे-

1) जागतिक प्रश्न व समस्यांची माहिती मिळते :- आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास केल्याने दोन देशातील आणि संपुर्ण जगातील प्रश्न त्याचे स्वरुप त्याची परिणामकारकता व उपायांची माहिती मिळते. वर्तमान जगात आर्थिक सामाजिक व राजकीय स्वरुपाचे अनेक प्रश्न आहेत उदा:- शस्त्र अस्त्र स्पर्धा, दहशतवाद, पर्यावरणाचो

असंतुलन, जागतिक तापमान वाढ, गरीब श्रीमंत वाढती भा[illegible] गरीब दरी, वंशवाद, धार्मिक संघर्ष, सिमा प्रश्न, पाणी वाटपाचे प्रश्न, भू-खंडाचे प्रश्न इत्यादी. या सर्व प्रश्नांची सोडवणूक व त्याची सद्य स्थिती याबाबतची माहिती आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासातून प्राप्त होते.

2) परराष्ट्र धोरणाचे ज्ञान मिळविणे:-

आंतरराष्ट्रीय संबंध व परराष्ट्र धोरण या दोन्ही अभ्यासशाखा स्वतंत्र असल्या तरी परस्पर पूरक आहेत. या दोन्ही अभ्यासशाखेत राष्ट्रीय हितसंबंधाच्या संरक्षण, संवर्धन व वाढीला अभ्यासले जाते परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रीय हित संबंधाच्या संरक्षणाचे प्रयत्न राष्ट्र करतात. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाने अनेक देशांच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप परराष्ट्र धोरणाची कला व जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोण समजतो परिणामत: आपला अभ्यास परिपुर्ण होतो.

3) मानवी वर्तनाची माहिती मिळते:-

प्रत्येक देशाच्या जागतिक दृष्टीकोनाला दिशा देण्यात राजनय, परराष्ट्र मंत्री, संरक्षण मंत्री, पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष, सनदी अधिकारी या सर्वांचा सहभाग असतो. आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास केल्याने इतर देशाशी संबंध ठेवताना कशा प्रकारचे मानवी वर्तन आवश्यक असते हे समजते. आंतरराष्ट्रीय संबंधाशी निगडीत असणाऱ्या व्यक्तींच्या कर्तव्य व अधिकाराची जाणीव होते. बदलत्या परिस्थिती नुसार राष्ट्र व नेत्यांच्या वर्तनात भुमिकेत का बदल होतो हे समजते. व्यक्तीच्या वर्तनातील बदल

राष्ट्रातील अविश्वास व तणाव निर्मितीस कशा कारणी भूत ठरतो याचे आकलन होते.

४) सत्ता संघर्षाचा अभ्यास होतो :-

सत्ता संघर्षाचा खेळ म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारण प्रत्येक देशात सत्तेचा संघर्ष असतो. त्याच्या सत्ता संघर्षात बलाढ्य राष्ट्रांचा अधिक सहभाग असतो. बलाढ्य राष्ट्रांच्या सत्ता संघर्षाच्या राजकारणामुळे गटबाजीचे राजकारण उदयास येते. या गटबाजीच्या राजकारणात अनेकांचे अस्तित्व नष्ट होते तर काही महासत्ताक म्हणून उदयास येतात. सत्ता संघर्षाच्या राजकारणात प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हित संबंध संरक्षण करण्यास प्राधान्य देतो या प्राधान्यात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप नेहमी बदलते. या बदलत्या स्वरूपाचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासानेच होतो.

5) जागतिक स्थरावरील महत्त्वाच्या घटनांचे आकलन होते:-

आंतरराष्ट्रीय पातळीवर सदैव अनेक घटना घडत असतात. या प्रत्येक घटनांचा विविध देश व तेथील नागरिकांवर परिणाम होतो. जागतिक स्थरावरील प्रत्येक घटनेचा संबंध मानवी जीवनाशी आहे त्यावर आजचा नागरिक त्या विषयीचे ज्ञान मिळविण्याचा ~~स्व~~ प्रयत्न करतो. पर्यावरण, मानवी हक्क, स्त्रीवाद, दहशतवाद, वाढती आण्विक स्पर्धा, विभाग संघटना, व्यापार व आर्थिक धोरणातील बदल या सर्वांचे ज्ञान आजच्या मानवाला असणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाने हे ज्ञान

प्राप्त होते.

6) राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रीय वादाचा अभ्यास:- जगात विविध संस्कृतीचे अनेक देश आहे यातील प्रत्येक देश हित संबंधावर आधारीतच परराष्ट्र धोरणाची बांधणी करते. परराष्ट्र धोरणाच्या या बांधणीत राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद एक महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्राने स्विकारलेल्या परंपरा संस्कृती विचार प्रवाह, मुल्य यातून राष्ट्रवादाची बांधणी होते. राष्ट्रवादाचे स्वरुप, सहिष्णु, लोकशाही, धर्मनिरपेक्ष आणि आक्रमक व अतिरेकी असते. आक्रमक व अतिरेकी राष्ट्रवादामुळे जागतिक शांतता धोक्यात येते परिणामतः आंतरराष्ट्रवादात बिघाड होते. परस्पर सहकार्य, शांतता, सहजीवन, मानवता, इत्यादीमुळे राष्ट्रात आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन विकसीत होतो.

7) विश्वराज्य निर्माण करण्यासाठी:- आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाच्या अभ्यासामुळे विश्वराज्य म्हणजे काय विश्वराज्यासमोरील आव्हाने विश्वराज्याचे स्वरुप अशा अनेक बाबींचा अभ्यास होतो. विश्वराज्य निर्माण करण्यासाठी आपण काय करावे याची जाणीव राष्ट्र व नागरिकात निर्माण होते विश्वराज्यासमोरील समस्यांचे आकलन होते. जागतिक शांतता व मानवजातीच्या सुरक्षिततेसाठी अशा विश्वराज्याची आपणास आवश्यकता आहे. याची जाणीव सर्वसामान्य नागरिक व सर्वच राष्ट्रांना होते.